सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

**समादेशक , राज्य राखीव पोलीस बल, गट क्र ५ दौंड.**

यांचे कार्यालय ता.दौंड, जि.पुणे.

फॅक्स/फोन नं.०२११७/२६२३४७ **ई-मेल**-srpfgr5@rediffmail.com

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**जा. क्र. आस्था/प्रलि/सपोशि भरती / 3585/२०२३ दौंड दिनांक 17 , जुलै २०२३**

# समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट क्र.५ दौंड

## सशस्त्र पोलीस शिपाई भरती-२०२१

## प्रेसनोट

सशस्त्र पोलीस शिपाई भरती -२०२१ शारीरिक चाचणीमधील १९४४ उमेदवार लेखी परीक्षेसाठी पात्र झाले आहेत. या उमेदवारांची लेखी परीक्षा दिनांक २३/०७/२०२३ रोजी सकाळी ११.०० वा. **मेरी मेमोरीयल स्कुल, दौंड व वंदनीय राष्ट्रीय संत तुकडोजी महाराज विद्यालय, दौंड** या ठिकाणी घेण्यात येणार आहे.

सदर लेखी परीक्षेस पात्र उमेदवारांनी दिनांक २३/०७/२०२३ रोजी सकाळी ०८.०० वाजेपर्यंत वर नमुद परीक्षा केंद्रावर उपस्थित रहावे. परीक्षा अंदाजे सकाळी ११.०० वा. सुरू होईल. उशिरा येणाऱ्या उमेदवारांना परीक्षा केंद्रावर प्रवेश दिला जाणार नाही.

सदर लेखी परीक्षेसाठी येताना उमेदवार यांनी महाआयटी यांनी ई-मेलव्दारे पुरविलेले शारीरिक चाचणी व लेखी परीक्षेचे ओळखपत्र डाऊनलोड करुन त्याची कलर प्रिंट आणि आवेदन अर्जावरील दोन कलर पासपोर्ट साईज फोटो तसेच या कार्यालयाकडुन मैदानी चाचणी करीता पुरविण्यात आलेले ओळखपत्र सोबत घेऊन येणे अनिवार्य आहे . परीक्षा केंद्रावर उमेदवारांना मोबाईल फोन , डिजीटल घडयाळ , इलेक्ट्रॉनिक वस्तु किंवा इतर तत्सम वस्तू तसेच शक्यतो कोणत्याही प्रकारच्या बॅगा आणु नये. जर उमेदवारांनी बॅगा आणल्यास त्या परीक्षा केंद्राच्या बाहेर स्वत:च्या जबाबदारीवर ठेवण्यात याव्यात. सदरच्या बॅगा व त्यातील मौल्यवान व इतर वस्तु गहाळ / चोरीस गेल्यास त्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

तसेच परीक्षा केंद्रावर उमेदवांराना प्रश्नपत्रिका ,उत्तरपत्रिका , काळा पेन , तसेच पॅड बैठक व्यवस्थेच्या ठिकाणी पुरविण्यात येणार आहे. याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी. सदरची लेखी परीक्षा नि:पक्षपातीपणे व पारदर्शकपणे पार पाडण्यात येणार आहे. उमेदवारांनी कोणत्याही गैरमार्गाचा अवलंब करु नये. तसेच सदरची बाब निदर्शनास आल्यास तात्काळ भरती प्रमुखांशी संपर्क साधावा. **( सोबत सर्वसाधारण सुचना )**

**( विनीता साहू ) भा.पो.से.**

**समादेशक**

राज्य राखीव पोलीस बल गट क्र ०५ दौंड

# समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट क्र.५ दौंड

## सशस्त्र पोलीस शिपाई भरती-२०२१

## उमेदवारांसाठी सुचना

१. लेखी परीक्षेचे प्रवेशपत्र असणाऱ्या उमेदवारांना परीक्षा केंद्रात प्रवेश दिला जाईल.अन्यथा लेखी परीक्षेसाठी प्रवेश दिला जाणार नाही.

२. लेखी परीक्षा ९० मिनिटांची व १०० गुणांसाठी आहे. परीक्षा मराठी भाषेत घेण्यात येईल.

३. उमेदवारांनी परीक्षा केंद्रावर परीक्षा सुरु होण्यापुर्वी तीन तास अगोदर पोहचणे अपेक्षित आहे.

४. उत्तरपत्रिका कार्बनलेस OMR प्रकारची दोन प्रतीत असेल व दुय्यम प्रत उमेदवारास त्याचे सोबत घेवुन जाण्यास परवानगी असेल.

५. उमेदवारांना लेखी परीक्षेमध्ये किमान ४० टक्के गुण मिळविणे अनिवार्य आहे. लेखी परीक्षेमध्ये ४० टक्के पेक्षा कमी गुण असलेले उमेदवार अपात्र समजण्यात येतील.

६. परीक्षा केंद्रात एकदा प्रवेश केल्यानंतर परीक्षा संपेपर्यंत बाहेर जाण्यास सक्त मनाई राहील.

७. परीक्षा केंद्रात मोबाईल फोन/ डिजीटल डायरी/ मायक्रोफोन/ कॅलक्युलेटर/ नोट पेड /नोट्स पुस्तके /ईअरफोन /hearing aide device / smart watch इत्यादी तसेच इतर कुठलेही असे साहीत्य, ज्याचा कॉपी करण्यासाठी उपयोग होईल अथवा उपयोग होऊ शकतो असे साहीत्य आणण्यास सक्त मनाई आहे. असे करणारा उमेदवार आढळून आल्यास त्यास त्याच क्षणी बाद ठरवुन त्याची उमेदवारी रद्द करण्यात येईल. तसेच कसुरदाराविरुद्ध कायदेशीर कारवाही करण्यात येईल.

८. OMR Sheet वरील सूचनांचे काटेकोरपने पालन करावे. तसेच फक्त काळ्या शाईचे बॉल पॉइंट पेन सोबत आणावे.

९. OMR Sheet वर स्वत:ची ओळख उघड  होईल असे कोणतेही चिन्ह नमुद करू नये/नाव लिहू नये / खाडाखोड करू नये, तसे आढळून आल्यास त्या उमेदवारास भरती प्रक्रियेतुन बाद ठरविण्यात येईल.

१०. परीक्षा उपकेंद्रावरील उपस्थितीकरीता निर्धारित केलेल्या वेळेस उपस्थित राहणे आवश्यक असुन अंतिम प्रवेशाकरीता निर्धारित केलेल्या वेळेनंतर उमेदवारास कोणत्याही परिस्थिती मध्ये परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

११. परीक्षेच्या वेळी ओळखीच्या पुराव्यासाठी आधार कार्ड, निवडणूक आयोगाचे ओळखपत्र, पासपोर्ट , पॅनकार्ड किंवा स्मार्ट कार्ड प्रकारचे ड्रायव्हिंग लायसंन्स यापैकी कोणतेही एक मुळ ओळखपत्र व त्याची सुस्पष्ट छायांकित प्रत सादर करणे अनिवार्य आहे. त्याशिवाय प्रीक्षेस प्रवेश नाकारला जाईल.

१२. परीक्षा उपकेंद्र प्रमुख, पर्यवेक्षक, समवेक्षक आदींकडून वेळोवेळी देण्यात येणाऱ्या सुचनांचे पालन करणे आवश्यक राहील.

१३. उमेदवार कोणत्याही टप्यावर अपात्र असल्याचे आढळुन आल्यास त्याची उमेदवारी रद्द करण्यात येईल.

१४. निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्यावर उमेदवाराच्या बायोमॅट्रीक सत्यापणासाठी डिजीटल स्वरुपात उमेदवारांच्या बोटाचे ठसाच्याव्दारे पडताळणी केली जाईल.

१५. बायोमॅट्रीक पडताळणीवेळी उमेदवार अस्सल नसल्याचे आढळुन आल्यास त्याच्यावरील कायदेशीर कारवाईव्यतिरीक्त उमेदवारी रद्द होवु शकते.

**कृपया मागे पहा**

१६. बायोमॅट्रीक पडताळणीकरीता अडचण निर्माण होवुन प्रवेश नाकारला जावु नये, याची उमेदवाराने स्वत: दक्षता घेणे आवश्यक आहे. त्याकरीता उमेदवाराने हातावर मेहंदी,शाई,रसायन इ. प्रकारची कोणतीही बाहय वस्तु / पदार्थ लावु नये.

१७. भरती प्रक्रियेच्या लेखी परीक्षेदरम्यान कोणत्याही टप्यावर उमेदवाराने गैरवर्तन / गैरकृत्य,भरतीसाठी गैरमार्गाचा अवलंब केल्याचे निदर्शनास आल्यास उमेदवारी तात्काळ रद्द करण्यात येईल.

१८. पोलीस भरतीमध्ये कोणत्याही अमिषाला बळी पडु नका.

१९. लाच देणे किंवा लाच घेणे हे दोन्हीही कायद्याने गुन्हा असुन असे आढळुन आल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांना टोल फ्री क्र.१०६४ या क्रमांकावर संपर्क साधावा.

२०.पोलीस भरती संबंधाने कोणत्याही भुलथापांना व अफवाना बळी पडु नये.

२१.पोलीस भरती संबंधाने कोणतीही अफवा आढळुन आल्यास नियंत्रण कक्ष राज्य राखीव पोलीस बल गट क्र. ५ दौंड येथे संपर्क साधावा. (Mob No.7276768347 Landline No.02117-262347)

२२.राज्य राखीव पोलीस बल भरतीही नि:पक्षपातीपणे व पारदर्शकपणे होत असुन दलालापासुन सावध रहा.

**(विनीता साहू) भा.पो.से.**
समादेशक
राज्य राखीव पोलीस बल गट क्र ०५ दौंड